डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषि अभियांत्रिकी विभाग

## जाहीर लिलावाची सुचना

कृषि विद्याशाखा यांचे अधिनस्त असलेल्या कृषि अभियांत्रिकी विभागाच्या भांडारातील निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे लोखंडी शेती औजारे, मशिनरी व लाकडी भंगार साहित्याचा जाहीर लिलाव दिनांक २५/११/२०१९ सोमवार रोजी दुपारी ठिक १.०० वाजता कृषि अभियांत्रिकी विभागात कर्मशाळा कापणी पश्चात तंत्रज्ञान योजनेजवळ करण्यात येणार आहे.

तरी सदरील लोखंडी शेती औजारे, मशिनरी व लाकडी भंगार साहित्य ज्यांना विकत घ्यावयाचे असतील त्यांनी लिलावाच्या वेळी लिलावाच्या अटी व शर्ती मान्य असल्यास अनामत रक्कम भरून आधार कार्डासह कार्यालयीन वेळेत त्यांना साहित्य पाहावयास मिळतील. सदर नियम अटी व शर्ती विद्यापीठाच्या **www.pdkv.ac.in** या संकेत स्थळावर उपलब्ध आहेत.

विभाग प्रमुख,
कृषि अभियांत्रिकी विभाग,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला, कृषि नगर-४४४१०४.

कृषि अभियांत्रिकी विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला या कार्यालयाच्या अंतर्गत असलेल्या भांडारातील निरूपयोगी, दुरूस्त न होण्याजोगे लोखंडी शेती औजारे, मशिनरी व लाकडी भंगार साहित्य लिलावाच्या अटी व शर्ती

(लिलाव सोमवार दिनांक २५/११/२०१९)

१. लिलावात निघालेले भंगार वस्तू, अवजारे व सयंत्रे ''जसे आहे जिथे आहे'' या तत्वावर होईल.
२. जुन्या भंगार साहित्याचा लिलावात समावेश असुन त्याचा लिलाव करण्यात येईल.
३. ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी बोली सुरू होण्याआधी रू. १,०००/— (एक हजार) रोखीने भरणा करावे. तसेच दुपारी १.०० वाजता नंतर कुठलीही रक्कम स्विकारली जाणार नाही याची नोंद घ्यावी.
४. ज्यांनी अनामत रक्कम दुपारी १.०० वाजताच्या आत भरली असेल त्यांनाच बिडर नंबर देण्यात येईल व त्यानांच लिलावाच्या ठिकाणी आधार कार्डच्या झेरॉक्ससह हजर राहता येईल व लिलावात भाग घेता येईल. इतर कोणत्याही व्यक्तीस लिलावाच्या स्थळी थांबता येणार नाही.
५. लिलाव समितीचे सदस्य व संबंधीत कार्यालयीन कर्मचारी लिलावाचे ठिकाणी उपस्थित राहू शकातील.
६. लिलाव समिती बोलणी बोलणाऱ्या व्यक्तीची जास्तीत जास्त बोली मान्य असेल त्यांना लिलावाची बोली म्हणुन मान्यता देण्यात येईल व त्या बाबतचा अंतिम निर्णय गठीत केलेल्या समितीच्या मंजुरीनंतर ही बोली मान्य अथवा अमान्य असल्याचे जाहीर करण्यात येईल.
७. अपेक्षित किंमत आल्याशिवाय लिलावाची बोली मान्य करणे अथवा न करणे लिलाव समितीच्या निर्णयावर अवलंबून राहील.
८. साहित्य बोली कायम झाल्यास सदर वस्तुंच्या किंमती कायम झालेल्या किंमतीच्या ५० टक्के रक्कम त्याच दिवशी व उर्वरीत ५० टक्के रक्कम लिलाव मंजुर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी भरावी लागेल आणि उर्वरीत रक्कम न भरलस सदर लिलाव रद्द करण्यात येईल व जमा असलेली रक्कम जप्त करून विद्यापीठ निधीत जमा करण्यात येईल.
९. बोली कायम झाल्यास संबंधीत व्यक्तिंनी सर्व साहित्य ताब्यात मिळताच स्वखर्चाने वाहून नेण्याची व त्यानंतर सर्व खर्चाची व जोखमेची जबाबदारी त्यांची स्वत:ची असेल.
१०.लिलाव झालेल्या साहित्याची पुर्ण किंमत भरल्यानंतर सदर वस्तु खरेदीदाराने ३ दिवसाच्या आत विद्यापीठ परिसरातून स्वत:च्या ताब्यात घ्यावी अन्यथा सदर साहित्याची देखभालीलची व गहाळ झाल्यास विद्यापीठाची जबाबदारी राहणार नाही याची नोंद घ्यावी..
११.ज्यांची बोली अमान्य ठरली असेल त्यांना रक्कम परत करण्यात येईल.
१२.साहित्याची वाहतूक करतांना विद्यापीठातील मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी खरेदीदाराची असेल.
१३.लिलावाबाबत काही तक्रार असल्यास त्याच दिवशी तशी लेखी स्वरूपात लिलावाच्या ठिकाणी लिलाव संपेपर्यंत द्यावी. अन्यथा तक्रारीचा विचार करण्यात येणार नाही. लिलावात सहभागी नसलेल्या व्यक्तीची तक्रार स्विकृत करण्यात येणार नाही..
१४.लिलावात काही अडचण अथवा वादविवाद उत्पन्न झाल्यास गठीत समितीचा निर्णय अंतिम आणि सर्वानाच बंधनकारक राहील
१५.लिलावातील लोखंडी अवजारे, मशिनरी व लाकडी साहित्य लिलावाच्या दिवशीपर्यंत पाहण्यास खुली राहतील
१६.लिलाव कोण्त्याही कारणास्तव रद्द करण्याचा अधिकार गठीत समितीकडे राखुन ठेवला आहे. बोली मान्य अथवा अमान्य असल्याचे जाहीर करण्यात येईल.

विभाग प्रमुख,
कृषि अभियांत्रिकी विभाग,
डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ
अकोला, कृषि नगर-४४४१०४

# लिलावात सहभागी होण्याकरीता भरावयाचा अर्ज

१. संपूर्ण नांव : ..................................................................................................................................

२. संपूर्ण पत्ता : ..................................................................................................................................

३. मोबाईल नं. : ..................................................................................................................................

४. भरणा केलेली रक्कम : ......................................................................................................

५. आधार कार्ड नं. : ................................ (आधार कार्डची छायांकीत प्रत सोबत जोडली आहे)

(लिलावात सहभागी होण्याकरीता सर्व अटी व शर्ती मला मान्य आहे करीता अर्ज भरला आहे.)

ठिकाण : अकोला

दिनांक : / /२०१९ सही ................................